# *वार्तापत्र*

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक ३१/०३/२०१८

## *एक पुरुष माओवादी ठार*

दिनांक ३०/०३/२०१८ रोजी उपविभागात एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके कोटमी हद्दीतील मौजा हुमडी जंगल परिसरात सी-६० चे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना सायंकाळी ०५:४५ ते ०६.१५ वाजेच्या दरम्यान दबा धरून बसलेल्या माओवादयांनी पोलीस पथकावर अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल आणि स्वसंरक्षणार्थ पोलीसांनी माओवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. माओवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन माओवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

यानंतर सदर जंगल परिसरात शोध मोहिम राबविली असता ०१ पुरुष माओवादी मृतदेह मिळुन आला. तसेच ०२ रायफल आणि नक्षल वापरात असलेले दैनंदिन साहित्य मिळून आले. मृत पुरुष माओवादयाची ओळख पटविण्याचे काम चालु आहे. चकमकीनंतर सदर जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान तीव्र करण्यात आले.